दैनिक

# शुभ प्रभात

SHUBH PRABHAT | एक नव्या युगाचा आरंभ...

विभागीय वृत्तपत्र | www.shubhprabhat.co.in | E-Mail : dainikshubhprabhat@gmail.com

Marathwada : Volume No. 01, Issue No. 251, Marathi Daily Sunday, Date - 15 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4 PRGI Reg. No. - MHMAR/25/A1228

मराठवाडा अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २५१ वा | मराठी दैनिक | रविवार दि. १५ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४ ABD/544/2025-2027







# अंबडमध्ये संघटित टोळीविरुद्ध कारवाई

## अंबड तालुक्यात अवैध वाळू उपसा प्रकरण उघड; टोळीतील १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील आपेगाव व साष्टपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीररित्या वाळू उत्खनन करून तिची चोरटी विक्री करणाऱ्या संघटित टोळीचा महसूल विभागाने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात एकूण १६ जणांविरुद्ध विविध कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

तहसीलदार विजय चव्हाण यांना गोपनीय बातमीदारांकडून माहिती मिळाली होती की काही सराईत गुन्हेगार रात्रीच्या वेळी महसूल विभागाच्या गस्ती पथकावर पाळत ठेवून गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळूची चोरी करत आहेत. या माहितीची खात्री करण्यासाठी तलाठी सुनील उबरहंडे आणि दीपक गवारे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान दि. २ मार्च ते ४ मार्च २०२६ या कालावधीत अंदाजे २५० ते ३०० ब्रास वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे उघड झाले.

तपासादरम्यान मंगेश माउली चौधरी उर्फ सोनू चौधरी याच्या पुढाकाराने ही संघटित टोळी कार्यरत असल्याचे समोर आले. आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केल्यामुळे स्थानिक नागरिक त्यांची नावे सांगण्यास धजावत नव्हते. काही शेतकऱ्यांनीही आपल्या शेतातून रस्ता उपलब्ध करून देत या अवैध वाळू चोरीत सहभाग घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या बेकायदेशीर



उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला असून वाळूचे अंदाजित मूल्य सुमारे ७ लाख ५० हजार रुपये इतके असल्याचे सांगण्यात आले.

मंडळ अधिकारी नारायण धनसिंग बमनावम यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांसह खाण आणि खनिज अधिनियम १९५७, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये मंगेश माउली चौधरी, एजाज हारून बेग, सुदर्शन (पान २ वर...)

# जालन्यात एलपीजी गॅस मुबलक प्रमाणात उपलब्ध; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचा गैरवापर आणि काळाबाजार रोखण्यासाठी पुरवठा विभागाने मोठी कारवाई करत ५९ घरगुती सिलेंडर जप्त केले आहेत. काल दिवसभरात व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅसचा वापर करणाऱ्यावर प्रशासनाने ही छापेमारी केली असून ही छापेमारी अशीच सुरु राहणार असयाचे सांगण्यात. परंतु, जालना जिल्ह्यात मुबलक प्रमाणात गॅस उपलब्ध असुन नागरीकांनी विनाकारण धावपळ आणि गॅसचा काळाबाजार करुन नये असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केलंय.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा प्रशासनाला काही ठिकाणी घरगुती गॅसचा साठा करून तो जास्त दराने विक्री केला जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पुरवठा विभागाच्या पथकाने विविध ठिकाणी तपासणी मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान ५९ घरगुती एलपीजी सिलेंडर जप्त करण्यात आले.

घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी गॅसचा व्यावसायिक कारणांसाठी वापर करणे बेकायदेशीर असल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई केली जात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील हॉटेल, ढाबे आणि इतर व्यावसायिक आस्थापनांमध्ये घरगुती गॅसचा वापर होत असल्याच्या तक्रारींचीही चौकशी सुरू करण्यात आली आहे. (पान २ वर...)









## थोडक्यात...

### वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला स्वायत्तता देण्यासाठी समिती स्थापन



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. स्वायत्ततेच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे समितीचे सदस्य सचिव असतील.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय व शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता,संभाव्य लाभ, तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास समिती करणार आहे. यामध्ये एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना, व अधिकार. संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार व जबाबदाऱ्या. स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक व प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे. आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी व अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर नेर येथे उत्साहात

**जालना । प्रतिनिधी**

नेर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरास विविध विभागातील अधिकारी व मान्यवरांची उपस्थिती लाभली. सदरील शिबिरास आ. बबनराव लोणीकर, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार, तहसीलदार छाया पवार, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, मंडळ कृषी अधिकारी पवन बैनाडे, भरत नागरे, प्रियंका क्षीरसागर तसेच कृषी विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. आमदार बबनरावजी लोणीकर यांनी कृषी




विभागाच्या स्टॉलला भेट देऊन कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती घेतली व संबंधित अधिकाऱ्यांकडून योजनांचा आढावा घेतला.

शिबिरादरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले व आलेल्या समस्यांचे तत्काळ (पान २ वर...)

# चंदनझिरा पोलीस ठाणे इमारत बांधकामासाठी ५.५० कोटींचा निधी मंजूर

## आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नांना यश; तालुका पोलीस ठाण्यासाठीही प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला चंदनझिरा पोलीस ठाण्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ कडून चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या नव्या इमारत बांधकामासाठी सुमारे ५.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

जालना शहरातील वाढती लोकसंख्या व वाढत्या प्रशासकीय गरजांच्या पार्श्वभूमीवर चंदनझिरा येथे स्वतंत्र व सुसज्ज पोलीस ठाणे उभारण्याची मागणी प्रलंबित होती. यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या मार्फत रितसर




प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे सादर करण्यास मोठी मदतही मिळाली असुन या संदर्भात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी वेळोवेळी राज्य शासनाकडे पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री मा. ना.एकनाथराव शिंदे यांच्या कडे सातत्याने पाठपुरावा केला.

इमारतीसाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी औद्योगिक विकास महामंडळाकडे मागणी करण्यात आली होती. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत (पान २ वर...)

# राणीउंचेगाव येथे ७२० नागरिकांना महाराजस्व समाधान शिबिरात जागेवरच लाभ

## आ. उढाण व जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीती विविध दाखले, योजनांचे मंजुरी पत्रे वाटप




**घनसावंगी । संतोष तळपे**

राणी उंचेगाव महसूल मंडळात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर(टप्पा १) अत्यंत उत्साहात आणि नागरिकांच्या प्रतिसादात संपन्न झाले. शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी दुपारी ४ वाजता मिळालेल्या माहितीनुसार या शिबिराच्यामाध्यमातून प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारी पोहोचवण्यात आल्या असून, एकाच दिवशी ७२० नागरिकांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.

या शिबिराचे उद्घाटन घनसावंगी मतदारसंघाचे आ. हिकमत उढाण आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महसूल विभागासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी आपल्या प्रास्ताविकात (पान २ वर...)

# सोलार प्रकल्पांवरील वायर चोरीप्रकरणी आंतरजिल्हा टोळी जेरबंद; १७.८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

सोलार ऊर्जा प्रकल्पांवरील वायर चोरी करून अनेक जिल्ह्यांत धुमाकूळ घालणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला छत्रपती संभाजीनगर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने जेरबंद केले. पाचोड पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेत १७ लाख ८ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात भाऊसाहेब लहु पवार यांनी फिर्याद दिली होती. १ मार्च २०२६ रोजी रात्री पाचोड सब स्टेशन परिसरातील सोलार प्रकल्पावरून डीसी केबल, कंडूड पाईप, एमसी कनेक्टर यांची तोडफोड करून सुमारे १ लाख १० हजार रुपयांचे साहित्य चोरीला गेले होते. त्यानुसार गुन्हा दाखल




करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह आणि पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करत होते. गुप्त (पान २ वर...)

# सैलानी दर्गा येथे अंधश्रद्धा पोटी शेकडो झाडांना ठोकले जातात खिळे

## अनेक वृक्ष कोलंमडली, झाडांच्या वेदनांवर अखेर फुंकर



**सोयगाव । दिलीप शिंदे**

बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध सैलानी दर्गा येथे अंधश्रद्धेमुळे झाडांना मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे समोर आले आहे. भूत-प्रेत, करणी किंवा अंगात येणे यांसारख्या (पान २ वर...)

### लवकरच विशाल मोहीम

वनविभाग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्थानिक स्वयंसेवक, मी स्वतः ही सर्व वृक्ष संपदा जतन व वेदनामुक्त व्हावी म्हणून खिळे मुक्त वृक्ष ही विशाल मोहीम पुढील सप्ताहात राबविणार आहे.श्रद्धेस आमचा विरोध नाही मात्र झाडं ही देव स्वरूप असतात, त्यांचे पर्यावरण व संस्कृती मध्ये मोठे योगदान असते म्हणून सर्व विचाराच्या लोकांना सोबत, समजूतदारीने ही अनिष्ठ बाब बंद होऊ शकते.

**- डॉ. संतोष पाटील,** सोयगाव - सिल्लोड

# घाणेवाडी पाईपलाईनवरील चोरीचे गडर हस्तगत

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील पाणीपुरवठा योजनेशी संबंधित महत्त्वाच्या साहित्याची चोरी झाल्याच्या प्रकरणात चंदनझिरा पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. घाणेवाडी ते जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणाऱ्या पाईपलाईनवरील कन्हैया नगर नाल्याजवळून चोरीला गेलेले २० फूट लांबीचे लोखंडी गडर पोलिसांनी शोधून काढले असून ते जप्त करून चंदनझिरा पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी घाणेवाडी जलवाहिनीवरील कन्हैया नगर परिसरातील हे लोखंडी गडर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेशी संबंधित साहित्य चोरीला गेल्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. तसेच या घटनेमुळे सार्वजनिक



मालमत्तेच्या सुरक्षेबाबत प्रश्नही उपस्थित झाले होते.

या प्रकरणाचा तपास सुरू असताना चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या पथकाने सतर्कता दाखवत विविध ठिकाणी चौकशी आणि तपास सुरू ठेवला. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी दिनांक १४ मार्च २०२६ रोजी चोरीला गेलेले २० फुटी लोखंडी गडर शोधून काढण्यात यश मिळवले.

सदर साहित्य जप्त करून चंदनझिरा पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले असून या (पान २ वर...)

## संपादकीय

# वाळूचोरी...

अवैध वाळू उपसा हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो शासनाच्या महसुलावर डल्ला मारणारा आणि कायदा-सुव्यवस्थेलाही आव्हान देणारा गंभीर गुन्हा बनला आहे. नदीपात्रातून बेकायदेशीररीत्या वाळू काढून तिची चोरटी विक्री करणाऱ्या टोळ्या अनेक ठिकाणी सक्रिय असल्याचे वारंवार समोर येत आहे. अंबड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात उघडकीस आलेले अवैध वाळू उत्खनन प्रकरण हे त्याचेच ताजे उदाहरण म्हणावे लागेल. महसूल विभागाने केलेल्या धडक कारवाईत संघटित पद्धतीने वाळू चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश होऊन १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई प्रशासनाच्या सजगतेचे उदाहरण असले, तरी अशा प्रकारचे रॅकेट दीर्घकाळ कसे सुरू राहते, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. कारण अवैध वाळू उत्खनन ही केवळ चोरी नसून त्यामागे मोठे आर्थिक हितसंबंध, स्थानिक पातळीवरील संगनमत आणि कधीकधी दहशतीचे वातावरणही असते. वाळू माफियांच्या कारवायांमुळे नदीपात्रांचे नैसर्गिक संतुलन बिघडते. अनियंत्रित उत्खननामुळे नदीचा प्रवाह बदलतो, पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढते आणि शेती तसेच भूजल पातळीवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे हा प्रश्न पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. यासोबतच शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडतो, ज्याचा परिणाम विकासकामांवर होतो. या प्रकरणात काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतातून रस्ते उपलब्ध करून देत वाळू चोरीला मदत केल्याचेही समोर आले आहे. यावरून केवळ गुन्हेगारच नव्हे, तर स्थानिक पातळीवरील काही घटकही या अवैध व्यवसायाला हातभार लावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अवैध वाळू उपशावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाबरोबरच समाजानेही जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. प्रशासनाने या प्रकरणात कठोर कारवाईचा इशारा देत मोक्का, एमपीडीए आणि तडीपार यांसारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा उल्लेख केला आहे. जर या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या गेल्या, तर वाळू माफियांना आळा बसू शकतो. मात्र ही कारवाई सातत्याने आणि निष्पक्षपणे होत राहणे तितकेच आवश्यक आहे. अवैध वाळू उत्खनन रोखण्यासाठी प्रशासनाची कडक भूमिका, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांचे सहकार्य या तिन्ही बाबी अत्यावश्यक आहेत. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे ही केवळ सरकारची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जर वेळेत कठोर पावले उचलली नाहीत, तर नदीपात्रांचे होणारे नुकसान आणि त्याचे दूरगामी परिणाम भविष्यात अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकतात.

## गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन

**मुंबई । प्रतिनिधी**

इराण - इस्त्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

# सक्षम महिला - सशक्त महाराष्ट्र : महिला व बालविकास विभागाच्या कल्याणकारी योजना

भारतीय महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, महिला व बालविकास विभागामार्फत मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मनोधैर्य योजना तसेच आदिशक्ती अभियान अशा विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. या योजनांचे अधिक बळकटीकरण करून सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत सातत्याने विविध उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. भविष्यातही महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि सुरक्षा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक आणि आश्वासह आराखडा तयार करण्यात आला असून, विभागामार्फत त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूदीची घोषणा केली आहे. राज्यभरातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांच्या कल्याणासाठी योग्य आणि प्रभावी धोरण राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत आतापर्यंत सुमारे ३७ लाख महिला 'लखपती दीदी' बनल्या असून, आणखी २५ लाख लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. याशिवाय महिला बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची आणि स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे महिला स्वयंसहायता गटांना व्यवसायवृद्धीची संधी मिळून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

राज्यातील महिलांचे आरोग्य पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. आत्तापर्यंत दोन कोटी ३७ लाख पेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

### लेक लाडकी योजना

मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचे शिक्षण वाढवणे आणि त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक आधार देणे हा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत पात्र मुलीला जन्मापासून १८ वर्षांपर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण सुमारे १ लाख १ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते.

शासकीय महिला वसतिगृहे / आधारगृह

१६ ते ६० वर्ष वयापर्यंतच्या निराधार, निराश्रित परित्यक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेलया महिलांना आश्रय संरक्षण व मुलभूत सुविधा परुवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह याद्वारे पुनर्वसन करण्यात येते. पात्र महिलेस एक हजार, पहिल्या बालकास रूपये ५०० रूपये, दुसऱ्या बालकास ४०० रूपये अनुदान प्रदान करण्यात येते.

### संरक्षणगृह

अनैतिक व्यापार कायद्याअंतर्गत पोलीसांमार्फत कुंटखान्यातून सोडविलेल्या पिडीतेस संरक्षणगृहात ठेवण्यात येते. राज्यातील २० शासकीय महिला राज्यगृहांना संरक्षण गृहे म्हणून घोषित करण्यात आले.

बालगृहातील निराश्रित मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्यशासकीय व स्वयंसेवी संस्थांची आधारगृहे, महिला वसतीगृहे या संस्थांमधील अनाथ मुलीच्या विवाहासाठी २५ हजार अनुदान दिले जाते. १५ हजार रूपये मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत पाच वर्षाकरिता योजनेत गुंतविण्यात येतात. तसेच १० हजार रकमेची संसारोपयोगी साहित्य संस्थेमार्फत खरेदी करण्यात येतात.

### देवदासीकरीता कल्याणकारी योजना (श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना)

४० वर्षावरील प्रमाणीत देवदासीना उदर निर्वाहाकरीता दरमहा ६०० इतके निर्वाह अनुदान देण्यात येतात. देवदासीच्या पदवीधर मुलीच्या विवाहासाठी ५० हजार आणि पदवी नसल्यास २५ हजार अनुदान देण्यात येते. देवदासीच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी वर्षातून एकदा मुलासाठी १६०० तर मुलीसाठी १७५० एवढे दरडोई अनुदान देण्यात येते.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार

महिला व बालकल्याण क्षेत्रात तसेच आर्थिक, सामाजिक, उन्नतीसाठी, शिक्षण, पुनर्वसन, अंधश्रद्धा निमूर्लन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या महिला व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येते.

महिला व बालकल्याण समिती जिल्हा परिषद समिती मार्फत महिला व बाल विकासाची विविध कामे करण्यासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान देण्यात येते.

### महिला समुपदेशन केंद्र योजना

महिलांवर होणाऱ्या अत्याचारास आळा बसावा यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात सुरू करण्यात आली आहे. राज्यात १२६ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत.शुभमंगल सामुहिक विवाह योजनायोजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुलीच्या विवाहासाठी प्रति जोडपे १० हजार एवढे अनुदान वधुच्या कुटूंबियांच्या नावे देण्यात येतात.

### मनोधैर्य योजना

बलात्कार/पोस्को कायद्याअंतर्गत १८ वर्षाखालील बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ऍसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना तीन लाख ते रूपये १० लाखापर्यंत अर्थसहाय तसेच विविध सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

### १८१ टोल फ्री महिला हेल्प लाईन

हेलपलाईन नियंत्रण कक्षामध्ये ज्या जिल्ह्यांची तक्रार असेल, त्या संबंधित जिल्ह्यातीलवन स्टॉप सेंटरला ऑनलाईन पद्धतीने सदरील तक्रार पाठविली जाते. २०२३-२४ मध्ये २०३९ महिलांना आणि सन २०२४-२५ मध्ये माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत २२३० महिलांना सहाय्य प्रदान करण्यात आले.

### नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह

ज्या महिलांचे मासिक उत्पन्न शहरांत ५० हजार आणि इतर ठिकाणी ३५ हजार पेक्षा जास्त नाही अशा नोकरी करणाऱ्या महिलांना वसतीगृहात प्रवेश देण्यात येतो. ७४ वसतिगृह कार्यरत आहेत. नोकरी करणाऱ्या एकल महिलांसाठी नव्याने ५० वसतीगृहे सुरू करण्यात येणार आहे.

### वन स्टॉप सेंटर

महिलांबरोबर होणारे शारिरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना, अशा संकटांसाठी त्या महिलेस व तिच्या कुटुंबियाना न्याय मिळण्यासाठी तथा वैद्यकीय उपचारांसाठी राज्यात ४५ केंद्र कार्यरत आहेत. महिलेस वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीस सहाय, मानसोपचार, विधी सहाय, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इत्यादी सुविधा पुरविण्याची तरतूद करण्यात येते.

### शक्तीसदन

केंद्र पुरस्कृत शक्ती सदन योजनेअंतर्गत राज्यातील निराधार, निराक्षीत, नैसर्गिक आपत्तीत कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न वस्त्र निवारा व वैद्यकीय मदत कायदेविषयक समुपदेशन व हेल्पलाइन द्वारे मार्गदर्शन करण्यात येते तसेच लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या वेश्याव्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन शिक्षण व प्रशिक्षण देऊन पुनर्वसन केले जाते. राज्यात १९ सदन कार्यरत आहेत.महिलाना नोकरीत आरक्षणशासकीय निमशसकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये सेवा भरतीत महिलाना ३० टक्के आरक्षण.



### हुंडा प्रतिबंध अधिनियम

हुंडा देणे/ घेणे कृतीबाबत पाच वर्षाचा कारावास तसेच दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. हुंडा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने मागविण्यास कमीत कमी ६ महिने ते ५ वर्षापर्यंत कारावास तसेच दंडाची तरतूद आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'शी (डक्श) पोर्टल' सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून महिलांना ऑनलाइन पद्धतीने तक्रार नोंदविता येते. तसेच प्रत्येक आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती (खपींशीपरश्र उेश्रिरळपीं उेाळींशश) स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले असून, अशी समिती स्थापन न केल्यास संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

### स्थानिक तक्रार समिती

३६ जिल्ह्यात स्थानिक तक्रार समिती स्थापन करण्यात आली असून या अंतर्गत प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. तसेच राज्यात ६३,५४२ अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

### निरीक्षण गृह

अन्न वस्त्र निवारा वैद्यकीय औपचारिक अनौपचारिक शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षण समुपदेशन यासाठी विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी निरीक्षण गृह कार्यरत राज्यात १५ शासकीय निरीक्षण गृह व ४१ स्वयंसेवी अशी ५६ निरीक्षण गृह कार्यरत आहेत.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वांवर आधारित संधीची समानता देण्यासाठी अनाथ बालकांना एक टक्के आरक्षण देण्यात येते. तसेच अनाथ मुलांसाठी आरोग्य व शिक्षणासाठी फिरती पथके उपलब्ध करून देण्यात आली आहेत महाराष्ट्र कॅन्सर केअर योजना मंजूर करण्यात आली आहे गंभीर आजारांसाठी पाच लाखाहून अधिक आर्थिक मदत देण्यात येते.

महिलांसाठी व बालकांसाठीच्या हितकारक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असून, भविष्यातही महिला व बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी व सुरक्षसेसाठी नाविण्यपुर्ण उपक्रम आणि विविध उपाययोजना आखण्याचे विभागाचे ध्येय आहे. स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अशा कर्तृत्ववान मातांच्या विचारांचा आपल्याला वारसा आहे. हा वारसा पुढे नेण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर सक्षम महिला - सशक्त महाराष्ट्राची वाटचाल सुरू राहील.

**श्रद्धा मेश्राम/विसंअ**

## पान १ वरुन...

**अंबडमध्ये संघटित टोळीविरुध्द...**

अंकुश शेंद्रे, शहारूक आनवर शेख, राम मोरे, विलास खरात, समीर हारून बेग, आल्लमस सैयद, शाहीद हारून बेग, ज्ञानेश्वर उडदंगे, ज्ञानेश्वर बाबुराव शेंद्रे, रामेश्वर गौड, कृष्णा गोकुळ कट्टे, संजू उबरे, पांडुरंग जाधव आणि शरद नरके यांचा समावेश आहे.

दरम्यान, तहसीलदार विजय चव्हाण यांनी अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध पुढील काळात मोक्का, एमपीडीए आणि तडीपार यांसारखी कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच संबंधितांच्या चल-अचल संपत्तीवर बोजा टाकण्याची प्रक्रियाही राबवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्यांपासून दूर राहून महसूल प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

**जालन्यात एलपीजी गॅस...**

दरम्यान, जालना जिल्ह्यात एलपीजी गॅसचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच गॅससाठी अनावश्यक साठेबाजी करू नये, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

तसेच जिल्ह्यात कुठेही एलपीजी गॅसचा अनधिकृत साठा केला जात असल्याची किंवा ठरलेल्या किमतीपेक्षा जास्त दराने विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी प्रशासनाला कळवावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. अशा प्रकारांवर पुढील काळातही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

**छत्रपती शिवाजी महाराज...**

निरसन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती मिळाली तसेच त्यांच्या समस्या सोडविण्यास मदत झाली. त्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

**चंदनझिरा पोलीस ठाणे...**

एमआयडीसी क्षेत्रात जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे यासाठी जालना औद्योगिक विकास मंडळ परिसरात २० आर जमिन उपलब्ध करून देण्यात आली. आहे तसेच संबंधित जागेवरील सेवा शुल्क व बांधकाम परवाना शुल्क माफ करण्याबाबतही पाठपुरावा करण्यात आला आहे.

सध्या महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत पोलीस ठाण्याच्या इमारत बांधकामाची प्रक्रिया सुरू असून विविध प्रशासकीय स्तरांवर ती अंतिम टप्प्यात आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत चंदनझिरा पोलीस ठाण्याची एम आय डी सी जालना येथे आधुनिक व सुसज्ज पोलीस ठाण्याची इमारत उभी राहणार असुन यामुळे जालना औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या चोरीच्या घटना व गुन्हेगारीला आळा बसणार यामुळे उद्योग व उद्योगधंदे चालकाला मोठा फायदा होईल अशी माहिती आ. खोतकर यांनी दिली.

तसेच तालुका जालना पोलीस ठाणे व कदीम जालना पोलीस ठाणे इमारत बांधकामासाठी देखील पाठपुरावा सुरू असून या कामासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.लवकरच या दोन्ही पोलिस ठाण्याच्या नवीन इमारत बांधकामासाठी परवानगी मिळणार आहे.

या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उद्योग मंत्री उदयजी सामंत ,व अजय कुमार बंसल जिल्हा पोलिस अधीक्षक जालना यांचे सहकार्य लाभल्याचेही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले. व या सर्वांचे आभार व्यक्त केले.

**राणीउंचेगाव येथे ७२०...**

या अभियानाचा मुख्य उद्देश स्पष्ट केला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी राज्य सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे स्वरूप सविस्तरपणे मांडले तसेच नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या प्रलंबित कामांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांचे विविध अर्ज व प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे शासनाच्या सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध होत असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. असे सांगत आमदार हिकमत उढाण यांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करत जनतेला सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित केले.

या शिबिरात तहसीलदार रमेश पागोटे, गट विकास अधिकारी प्रदीप कदम, नायब तहसीलदार सोमनाथ तोतला, श्रीमती मोनाली सोनवणे, तालुका कृषी अधिकारी सखाराम पवळ, गट शिक्षणाधिकारी रवी जोशी, उपअधीक्षक भूमी अभिलेख श्रीमती शालिनी बिदरकर, दुय्यम निबंधक मनीषा पैठणे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र जोगड आणि विविध विभागांचे विस्तार अधिकारी, आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

महसूल, कृषी, पंचायत समिती आणि आरोग्य अशा सर्वच विभागांचे स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात आले होते.

नागरिकांकडून अर्ज स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. विविध दाखले, योजनांची मंजुरी पत्रे आणि इतर सेवांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेमुळे नागरिकांचा वेळ आणि हेलपाटे वाचल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. शेवटी गट विकास अधिकारी प्रदीप कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणासाठी विविध यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले. यामध्ये ट्रॅक्टर, हार्वेस्टर, रोटावेटर तसेच इतर कृषी उपकरणांचा समावेश होता.

**सोलार प्रकल्पांवरील बायर...**

माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे पवन ऊर्फ छन्नु महादेव काळे याला १३ मार्च २०२६ रोजी सापळा रचून पकडण्यात आले. चौकशीत त्याने साथीदार सुनिल बापू तपकिरे याच्यासह इतरांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली.

तपासात ईश्वर पांडुरंग गवळी याने गुन्ह्यासाठी वाहन उपलब्ध करून दिल्याचे, तर तवाब नवाब खान याने जाळलेले केबलमधील तांबे खरेदी केल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपींकडून मोबाईल, चोरीची तांब्याची तार, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेले स्कॉर्पिओ वाहन असा एकूण १७.०८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या टोळीने छत्रपती संभाजीनगर ग्रामीणसह जालना, बीड, धाराशिव, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातही सोलार केबल चोरीचे गुन्हे केल्याचा संशय असून त्याबाबत पुढील चौकशी सुरू आहे. मुख्य आरोपी पवन ऊर्फ छन्नु महादेव काळे हा सराईत गुन्हेगार असून दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यांतही तो फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईत पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, सहायक पोलीस निरीक्षक पवन इंगळे, सहायक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे तसेच पोलीस अंमलदार सचिन राठोड, सुनिल गोरे, विष्णु गायकवाड, अशोक वाघ, महेश बिरुटे, अनिल काळे, बलविरसिंग बहुरे, योगेश तरमाळे, जीवन घोलप आणि संजय तांदळे यांनी सहभाग घेतला.

**सैलानी दर्गा येथे...**

समजुतींमुळे भाविकांकडून झाडांमध्ये खिळे ठोकण्याची प्रथा सुरू असून त्यामुळे परिसरातील अनेक वृक्ष कोसळले आहेत, तर काही वृक्ष कोसळण्याच्या मार्गावर आहेत.

सैलानी दर्गा येथे अमावस्या, पौर्णिमा आणि यात्रेनिमित्त देशभरातून भाविक येतात. अंगातील व्याधी, संकट किंवा तथाकथित दुष्ट शक्ती दूर करण्यासाठी येथे खिळे, काळ्या बाहुल्या आणि बिब्बा झाडांमध्ये ठोकण्याची प्रथा अनेक वर्षांपासून सुरू आहे. या प्रकारामुळे दर्गा परिसरातील झाडांमध्ये लाखो खिळे ठोकले गेले असून त्यांचे एकत्रित वजन सुमारे सहा ते सात क्विंटल इतके असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या अंधश्रद्धेमुळे झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची दखल घेत सिल्लोड येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह (गतीविधी-पर्यावरण) तसेच अभिनव प्रतिष्ठानचे पर्यावरण रक्षक डॉ. संतोष पाटील यांनी वन विभागाकडे तक्रार केली आहे.

त्यांनी बुलढाण्याच्या विभागीय वन अधिकारी सरोज गवस आणि वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील वाकोडे यांना लेखी निवेदन देऊन या प्रकारावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

डॉ. पाटील यांनी स्वतः काही झाडांमधील खिळे काढून त्यांना वेदनामुक्त करण्याचा प्रयत्नही केला आहे.

वन विभागाने झाडांना खिळेमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, झाडांभोवती संरक्षक जाळी बसवावी, तसेच खिळे, काळ्या बाहुल्या व इतर साहित्याची विक्री रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात आणि जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र ट्री फेलिंग ॲक्ट १९६४ नुसार झाडांना इजा करणे किंवा खिळे ठोकणे हा गुन्हा असून अशा प्रकारांवर बंदी आहे. त्यामुळे या अंधश्रद्धेमुळे होत असलेल्या पर्यावरणाच्या हानीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

**घाणेवाडी पाईपलाईनवरील चोरीचे...**

चोरीप्रकरणी संबंधित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. शहरातील सार्वजनिक मालमत्तेच्या चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## थोडक्यात...

### ‘डायट’च्या माध्यमातून शिक्षणात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्न करा- शिक्षणमंत्री दादाजी भुसे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राज्यात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. वर्षभरात साडेसहा ते सात लाख शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची बाब कौतुकास्पद आहे. शिक्षणाच्या बाबतीत डायट (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) च्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम, यशोगाथा राज्यभर राबविले जावेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाच्या गुणवत्तेचा अभ्यास करून राज्यासाठी बेंचमार्क ठरवावा. तसेच शिक्षणात अपेक्षित बिंदूवर काम करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना अपेक्षित अग्रेसर राज्य होण्यासाठी प्रयत्न करावे असे निर्देश शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या आढावा बैठकीत शालेय शिक्षण मंत्री भुसे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, डायटचे संचालक हेमंत वसेकर, संचालक विठ्ठल कांबळे, सहसंचालक कमलादेवी आवटे यांच्यासह डायटचे अधिकारी, प्राचार्य उपस्थित होते. तर दूरदृश्यप्रणालीद्वारे जिल्हास्तरीय डायटचे प्राचार्य उपस्थित होते.

मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, ‘डायट’ने विद्यार्थ्यांची प्रगती, गुणवत्ता सुधारण्यासाठी दुवा म्हणून काम करावे. सामुहिक जबाबदारीने संवाद, समन्वय साधून अपेक्षित काम पूर्ण करावे. राज्यातील शिक्षक आपल्या स्तरावर विविध उपक्रम राबवत असतात, ते समाजासमोर यावेत. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी आवड निर्माण होण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुकास्तरावर कविता, निबंध स्पर्धांचे आयोजन करावे. कविता शिकविताना वेगळी चाल लावून दिल्यास विद्यार्थीनी त्वरित आत्मसात करतात. राज्यातील इतर माध्यमांच्या शाळांसाठी मराठीचा योग्य, सुलभ अभ्यासक्रम निवडा. दुसरीच्या पाठ्यपुस्तकात यंदा बदल करण्यात येणार असून पुस्तके बिनचूक प्रकाशित होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यात प्रत्येक शनिवारी दप्तरमुक्त आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविण्यात यावा. यामध्ये मुलांना योग, कवायत, देशभक्ती वाढीस लागण्यासाठी प्रयत्न, प्रबोधनासाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. मुलींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे, कला-क्रीडा यावर भर द्याव. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण, धाडस निर्माण होण्यासाठी मराठी आणि इंग्रजीमध्ये संवाद साधण्यास, भाषणास प्रवृत्त करावे, असे निर्देश.

प्रत्येक शाळेने वार्षिक कामकाज कॅलेंडरमध्ये माता-पालक मेळावा घेणे बंधनकारक करावे. त्या कार्यक्रमांचे जिओ टॅगिंग फोटो, व्हिडीओ शालेय शिक्षण आणि डायटच्या वेबसाईटवर अपलोड करावेत. प्रत्येक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. मुलांना अभ्यासाबरोबर समाजातील गोष्टीचे ज्ञान होण्यासाठी भाजी बाजार, बँकेचे कामकाज, विविध वाहनांच्या दुरूस्ती कार्याबाबत उपक्रम राबवावेत. यावर्षीही १५ जूनला शाळा प्रवेशावेळी मुलांच्या स्वागताचे कार्यक्रम घेण्याचे निर्देश भुसे यांनी दिले.

राज्यात विविध शाळा ग्रामस्थांच्या सहभागाने प्रगतीपथावर आहेत. भौतिक सुविधा, प्रशिक्षण, ज्ञानदान समर्पित भावनेने शिक्षकांनी करावे, मात्र शाळांच्या विकासासाठी लोकसहभाग वाढवून लोकचळवळ तयार करावी. माजी विद्यार्थी संघांना समाविष्ट करून घ्यावे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात अग्रेसर असलेल्या शाळांना इतर शाळांची प्रगती होण्यासाठी आसपासच्या शाळांची जबाबदारी देवून त्या शाळा आदर्श कराव्यात, असे निर्देशही भुसे यांनी केली दिले. गरदरेवाडीच्या (ता. दौड) शाळेने लोकसहभागातून आंतरबाह्य बदल केले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी ही शाळा प्रयत्नशील आहे, याठिकाणी २२ मार्चचा कार्यक्रम यू-ट्यूबवरून थेट प्रसारित करण्यात येणार आहे. या शाळेचा आदर्श घेवून १२५ गावांनी पुढे जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मंत्री भुसे यांनी दिली.

# गॅस टंचाईचा फायदा; सायबर भामट्यांनी चार दिवसांत २६ लाखांचा गंडा

**मुंबई । प्रतिनिधी**



इराण-इस्त्रायल युद्धा दरम्यान देशभरातून डझ्रक्ष गॅस टंचाईचे वृत्त समोर येत आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरात एलपीजी गॅस बुकिंग आणि सिलेंडर नेण्यासाठी एजन्सीबाहेर नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. याच परिस्थितीचा काही सायबर भामट्यांनी फायदा घेतला आहे. गॅस टंचाईने नागरिक अगोदरच भयभीत झाले आहेत. त्यातच सायबर भामटे नागरिकांशी संपर्क करून गॅस कनेक्शन कट करण्याची भीती दाखवून गंडा घालत आहेत. आतापर्यंत मुंबईत चार दिवसांत २६ लाख रुपयांची लूट सायबर भामट्यांनी केली आहे.

सायबर गुन्हेगार आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसचा तुटवडा, इराण-इस्त्रायल युद्धाचा फायदा उचलत लोकांना गंडा घालत आहेत. माहितीनुसार, हे सायबर ठग महानगर गॅस लिमिटेडचे अधिकारी असल्याचे भासवून फोन करत आहेत. तुमचे गॅसचे बिल थकलेले आहे आणि कनेक्शन आता कापणार असल्याची धमकी देत गंडा घालत आहेत. हे कनेक्शन वाचवण्यासाठी अगोदर १०-२० रुपये भरण्यास सांगितले जाते. त्यानंतर ‘ाहरपरसरी रज्ञि’ फाईल डाऊनलोड करण्यास सांगण्यात येते. त्यावर क्लिक करताच ग्राहकांच्या बँक खात्यातील रक्कम उडवण्यात येते.

गेल्या चार दिवसात विले पार्ले, वडाळा सारख्या भागातून सायबर फसवणुकीच्या चार घटना समोर आल्या आहेत. यामध्ये ग्राहकांना आतापर्यंत एकूण २६ लाख ४३ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. अनेक जण पूर्वीपासूनच गॅसच्या टंचाईने हैराण आहेत. त्याचा फायदा ही सायबर गँग उचलत आहे. सायबर भामटे सर्वसामान्य नागरिकांना निशाणा बनवत आहेत. त्यांच्या मेहनतीचा पैसा चोरत आहेत. बँकेतील रक्कमेवर डल्ला मारत आहेत.

दरम्यान महानगर गॅसने ग्राहकांना अशा सायबर भामट्यांपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अधिकृत क्रमांकावरच संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. तर ग्राहकांना कंपनी कोणत्याही प्रकारची लिंक डाऊनलोड करण्यास सांगत नसल्याचे म्हटले आहे. ग्राहकांनी अधिकृत नंबरशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले.

## दहिसरमध्ये किरकोळ वादातून युवकाची चाकूने गळा कापून हत्या

**मुंबई । प्रतिनिधी**



दहिसरमध्ये किरकोळ वादातून एका युवकाची चाकूने गळा कापून केली हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. घराबाहेर बाईक पार्क करण्यावरून दोन्ही युवकांमध्ये होळीच्या दिवशी वाद झाला होता. याचाच राग मनात धरुन आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास चाकूने आरोपीने एका युवकाची गळा कापून हत्या केली आहे. एम.एच.बी पोलिसांकडून आरोपीला तासाभरातच अटक करण्यात आली आहे.

दहिसर पश्चिम येथील गणपत पाटीलनगर गल्ली नंबर ५ मध्ये होळीच्या दिवशी घरा बाहेर बाईक पार्क करण्यावरुन झालेल्या किरकोळ वादातून आज एका युवकाची हत्या झाली आहे. सकाळी पावणे ११ वाजता दहिसर पश्चिम गणपत पाटील नगर गल्लीत झालेल्या भांडणात चाकू हल्ला झाला आहे. मृत युवकाचे नाव भरत आढाव असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच एमएचबी पोलिसांची तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. हत्या करणाऱ्या आरोपी कृष्णा राजा यादव याला एम.एच.बी पोलिसांनी अवघ्या १ तासात केली अटक केली आहे. हत्येसाठी वापरलेला चाकू पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणात आणखी कोण सहभागी आहे का याचा तपास सुरु आहे. यापूर्वीही या परिसरात ट्रिपल मर्डरची घटना घडली होती.

या घटनेमुळं परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# रत्नागिरीत अल्पवयीन मुलावर अत्याचार

**रत्नागिरी । प्रतिनिधी**



शहरात माणुसकीला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी रत्नागिरी शहर पोलिसांनी दोघा तरुणांना अटक केली आहे. या किळसवाण्या प्रकारामुळं परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना २२ फेब्रुवारी रोजी रत्नागिरी शहरातील राजिवडा परिसरात घडली. या प्रकरणात जुबेर सलीम शेख (वय २२) आणि मुस्तकीन गडकरी (वय २४) यांनी एका अल्पवयीन बालकावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडित मुलगा घाबरलेल्या अवस्थेत असल्यामुळं त्यानं सुरुवातीला हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला नव्हता.


दरम्यान आरोपींनी या कृत्याचा व्हिडीओ तयार करून तो सोशल मीडियावर प्रसारित केला. १२ मार्च रोजी पीडित मुलाच्या वडिलांच्या निदर्शनास सोशल मीडियावर हा व्हिडीओ आला. व्हिडीओ पाहिल्यानंतर त्यांना मोठा धक्का बसला, कारण त्यामध्ये दिसणारा मुलगा त्यांचा स्वतः चा मुलगा असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. यानंतर त्यांनी तात्काळ रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

पालकांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांसह झजउडज कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. तसंच कृत्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित केल्यामुळं माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसारही गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कायद्यातील तरतुदींनुसार, अल्पवयीन मुलांवरील अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये कडक शिक्षेची तरतूद आहे.

या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेता पोलीस निरीक्षक विवेक पाटील यांनी स्वतः तपास हाती घेतला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून हा व्हिडीओ आणखी कुठे प्रसारित करण्यात आला आहे का, याचा तांत्रिक तपास सध्या सुरू आहे.

## धनगर आरक्षणासाठी महाधिवक्ता यांच्यासोबत बैठक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**



धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत कायेदशीर तोडगा काढण्यासाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळासोबत राज्याच्या महाधिवक्ता यांच्या सोबत बैठकीचे तातडीने आयोजन करण्यात येईल, जेणेकरुन धनगर बांधवाच्या आरक्षणासंदर्भात कायदेशीर दिशा स्पष्ट होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली धनगर आरक्षणासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाच्या मागण्यांसंदर्भात बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार रामराव वडकुते, शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात असलेल्या धनगर समाजाचे ऐतिहासिक योगदान भरीव आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. हे आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकणारे असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राज्याच्या महाधिवक्ता यांच्यासोबत धनगर समाजातील या विषयाचा अभ्यास असलेल्या प्रतिनिधींच्या बैठकीचे आयोजन तातडीने करण्यात येईल. त्यातुन आरक्षणासाठीची कायदेशीर दिशा स्पष्ट होईल. कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देताना सर्व बाजू तपासून त्याची खातरजमा करुन आरक्षणाचा प्रस्ताव केंद्राकडे सादर करण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## मिरा रोडवर कर्तव्य बजावत असलेल्या वाहतूक पोलिसावर हल्ला; आरोपी फरार

**मुंबई । प्रतिनिधी**



ठाण्यातील मिरा रोड येथील काशीमीरा परिसरात कर्तव्य बजावत असताना वाहतूक पोलिसावर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वाहतूक पोलीस किरण सहाणे हे अमर पॅलेस परिसरात वाहतूक नियंत्रणाचे काम करत होते. यावेळी ही घटना घडली. दोन दुचाकीस्वारांमध्ये एकमेकांना कट मारण्याच्या कारणावरुन जोरदार वाद सुरु झाला होता. सदर वाद मिटवण्यासाठी पोलीस किरण सहाणे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच वेळी एका दुचाकीस्वाराने संतापाच्या भरात सहाणे यांच्यावरच हल्ला करत त्यांना मारहाण केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेनंतर मारहाण करणारा दुचाकीस्वार घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी काशीमीरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलिसांकडून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, कर्तव्यावर असलेल्या पोलिसावरच हल्ला झाल्यामुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

## शिधावाटप विभागाच्या धडक कारवाईत वरळीत गॅस सिलिंडरचा काळाबाजार उघड; मोठा साठा जप्त

**मुंबई । प्रतिनिधी**



वरळी परिसरात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या टोळीवर शिधावाटप विभागाने धडक कारवाई करत मोठा साठा जप्त केला. रहिवासी भागात धोकादायक पद्धतीने सिलिंडर साठवून काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याचा प्रकार या कारवाईत उघडकीस आला.

नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या फिरत्या पथकाने आणि कार्यालय क्रमांक २१ च्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. वरळी नाका येथील गणपतराव कदम मार्गावरील ‘सूरज वल्लभदास चाळ’ परिसरात गॅस सिलिंडरची अवैध साठेबाजी करून चढ्या दराने विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने तातडीने छापा टाकत अवैधरित्या साठवलेले सिलिंडर जप्त केले.

या कारवाईत एचपी गॅस कंपनीचे पाच किलोचे सहा भरलेले आणि ५८ रिकामे सिलिंडर हस्तगत करण्यात आले. तसेच सुपर गॅस कंपनीचे चार किलोचे ६४ भरलेले आणि १२ किलोचे १९ भरलेले सिलिंडर जप्त करण्यात आले. याशिवाय १२, चार आणि दोन किलोचे विविध आकाराचे २५ रिकामे सिलिंडरही सापडले.

हे सिलिंडर बेकायदेशीररीत्या रिफिलिंग करून काळ्या बाजारात विकण्यासाठी ठेवण्यात आले होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जप्त करण्यात आलेला सर्व मुद्देमाल पुढील फौजदारी कारवाईसाठी वरळी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आला आहे. रहिवासी भागात अशा प्रकारे सिलिंडर साठवणे आणि त्यांची बेकायदेशीर विक्री करणे अत्यंत धोकादायक असून त्यामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होऊ शकतो, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

ही कारवाई नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विभागाची पथके २४ तास सतर्क असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## राज्यात एलपीजी टंचाई तीव्र; सिलेंडरसाठी रांगा

**मुंबई । प्रतिनिधी**



सध्या राज्यात अभूतपूर्व अशी एलपीजी सिलेंडर कोंडी झाली आहे. सरकार सिलेंडर असल्याचा दावा करत आहे. तर गॅस एजन्सीसमोरील गर्दी हटायचे नाव घेत नसल्याचे चित्र आहे. भल्या पहाटे पाच वाजेपासून लोक सिलेंडरसाठी रांगेत उभे आहेत. ऑनलाईन गॅस बुकिंग होत नसल्याने चाकरमान्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. तर दुसरीकडे रिक्षा चालकांनाही गॅस दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. दरवाढीने भाडेवाढ झाल्याने सर्वसामान्यांना दुहेरी मार सहन करावा लागत आहे. महागाईचे चटके सर्वसामान्य नागरिकांना सहन करावे लागत असल्याचे चित्र आहे.

जळगावातील इच्छा देवी चौक परिसरातील एलपीजी गॅस पंपावर गॅस भरण्यासाठी रिक्षांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत.जळगाव शहरात एलपीजी गॅसचे एकूण तीन पंप असून दोघांवरील गॅस संपल्याने एकच गॅस पंप सध्या स्थितीत सुरू आहे. एकाच पंपावर गॅस शिल्लक असल्याने रिक्षामध्ये गॅस भरण्यासाठी मोठ्या रांगा लागल्या आहेत. तब्बल दोन ते तीन तास रांगेत थांबून गॅस भरण्यासाठी रिक्षा चालकांचा नंबर लागत असल्याचा पाहायला मिळत आहे.

एकीकडे गॅसचा तुटवडा तर दुसरीकडे एलपीजी गॅस मध्ये अचानक झालेली वाढ यामुळे रिक्षाचालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. सुरुवातीला ५५ रुपये गॅसचा किलोमागे भाव होता मात्र आता अचानक ९० रुपये किलो एवढा भाव झाल्याने रिक्षा चालक आर्थिक संकटात सापडला आहे. रिक्षात भरण्याच्या एलपीजी गॅस मध्ये अचानक वाढ झाल्यामुळे रिक्षा चालकांनी नाराजी व्यक्त केली असून रिक्षा चालवणे परवडत नसल्याचे म्हटले आहे.

इगतपुरी शहरात व्यासायिक सिलेंडरचा तुटवडा कायम आहे. मुंबई आग्रा महामार्गावर असलेल्या हॉटेलव्यवसायिकांनी चुलीवर जेवण तयार करायला सुरुवात केली आहे. तर इतर हॉटेल व्यवसायिक चुली तयार करत आहेत. अनेक हॉटेल व्यवसायिकांनी मेनू मध्ये कपात केली आहे. मात्र चुलीवरचे जेवण परवडत नसल्याने काही दिवस हॉटेल बंद करण्याचा निर्णय काही जणांनी घेतला आहे. अगोदरच इगतपुरीतील काही हॉटेल बंद झाली आहेत.

राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परवाना देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित केली आहे. तथापि, प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई - बाईकना यापुढे मोटार वाहन विभागाकडे नोंदणी करून परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

## भावाच्या बाराव्यासाठी जयराम चाटे जेलबाहेर

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चेत आलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी जयराम चाटे याला काल (शुक्रवारी, ता १३) कडक पोलिस बंदोबस्तात जिल्हा कारागृहातून बाहेर काढण्यात आलं. जयराम चाटेच्या भावाचा मृत्यू झाल्याने त्याच्या धार्मिक विधीसाठी केज तालुक्यातील तांबवा या मूळ गावी उपस्थित राहण्याकरिता त्याने न्यायालयात अर्ज केला होता, ज्यावर अटी व शर्थीसह न्यायालयाने त्याला काही तासांची परवानगी मंजूर केली. जयराम चाटे याच्या भावाचे २ मार्च रोजी निधन झाले. या घटनेनंतर आपल्या मूळ गावी म्हणजेच तांबवा येथे धार्मिक विधीमध्ये सहभागी होता यावे, यासाठी जयराम चाटे याला काल (शुक्रवारी ता १३) सकाळी जिल्हा कारागृहातून बाहेर काढले होते.

जयराम चाटे याने आपल्या वकिलामार्फत न्यायालयाकडे विनंती केली होती. न्यायालयाने त्याला शुक्रवारी सकाळी ९:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंतची वेळ ठरवून दिली होती. या सात तासांच्या कालावधीत त्याला विधी पूर्ण करून पुन्हा कारागृहात हजर होण्याचे आदेश देण्यात आले होते. सात तासांच्या या सवलतीनंतर विधी आटोपून त्याला पुन्हा कारागृहात नेण्यात आले.

चाटेला कारागृहातून बाहेर काढून तांबवा गावी नेताना पोलिसांनी सुरक्षेची अत्यंत चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. पोलिसांची मोठी तुकडी आणि बंदूकधारी कर्मचारी त्याच्यासोबत तैनात करण्यात आले होते. कारागृहाबाहेर येताना जयराम चाटेच्या रुपात मोठे बदल दिसून आले. त्याने पूर्णपणे 'क्लीन शेव्ह' केलेली होती, कपाळावर मोठा लाल गंध लावलेला होता आणि अंगात काळा रेघाळ शर्ट होता, राखाडी रंगाची जिन्स आणि पायात महागडी चप्पल, असा त्याचा अवतार होता. शर्टची पहिली गुंडीही त्याने काढलेली दिसली. एका गंभीर हत्या प्रकरणातील आरोपी असूनही, जयरामच्या चेहऱ्यावर कसलाही तणाव किंवा भीती दिसून आली नाही. हातरुमाल घेऊन अत्यंत शांतपणे तो पोलिसांच्या ताफ्यात तांबवा गावाकडे रवाना झाला. जयराम चाटे १४ महिन्यानंतर जेल बाहेर पडला आहे. जयराम चाटेच्या भावाचे दोन मार्च रोजी निधन झाले होते. त्यानंतर केल्या जाणाऱ्या विधीसाठी जयराम चाटेच्या वकिलांनी न्यायालयात अर्ज केला होता. याच अर्जावर अटी शर्ती घालत न्यायालयाने जयराम चाटेला १२ व्याच्या विधीस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली.

This letter is issued by the **Owner Pooja Vishal Ugale** and the **printer, publisher Achut Dagdu More** Printed at Jagamitra Offset Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna Taluka and District Jalna - 431203 (Maharashtra) And Published at Office Dainik Shubh Prabhat, H.No. 327, Om Shanti Galli, Near Mammadevi Kirana Store, Sambhaji Nagar Jalna, Taluka and District Jalna - 431203 (MAHARASHTRA) Editor **Achut Dagdu More,** Mob. No. 7020871500, **E-mail : dainikshubhprabhat@gmail.com PRGI Registration Number - MHMAR/25/A1228**

**हे पत्र मालक पूजा विशाल उगले आणि मुद्रक, प्रकाशक अच्युत दगडू मोरे यांनी जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजी नगर जालना, तालुका जिल्हा जालना - ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक शुभ प्रभात, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. तालुका आणि जिल्हा जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : अच्युत दगडू मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1228, E-mail : dainikshubhprabhat@gmail.com**

# थोडक्यात...

## त्र्यंबक-नाशिकचा कुंभमेळा जगाला आकर्षण वाटणारा असावा - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

त्र्यंबक-नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन २०२७ मध्ये करण्यात येत असून या कुंभमेळ्यात देश-विदेशातून करोडो भाविक येणार आहेत. कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताची पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्र्यंबक-नाशिक सिंहस्थ कुंभमेळाकरिता करण्यात येत असलेल्या विविध कामांसाठी २२ हजार १८१ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात आयोजित कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ५ हजार १४० कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातील १७ हजार ४१ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. कुंभमेळा निमित्त सुरू असलेली आणि प्रस्तावित असलेल्या कामांमध्ये कुणी वाईट हेतूने किंवा मुद्दाम विलंब होण्याच्या हेतूने अडथळा आणत असेल, तर त्याची गय केली जाणार नाही. त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुंभमेळा निमित्ताने करण्यात येणाऱ्या कामांकरिता लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. नाशिक वर्तुळ मार्गातील अडथळे दूर करीत विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी. कुंभमध्ये स्वच्छता अत्यंत महत्वाची असून या कामांमध्ये करण्यात येणारी शौचालय दर्जेदार असावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या परिसरातील स्थानकांची पायाभूत सुविधांची कामे रेल्वेच्या माध्यमातून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निफाड रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात यावा, याबाबत रेल्वेने पडताळणी करून कार्यवाही करावी.

कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डी व शनिशिंगणापूरला निश्चितपणे जाणार आहेत. त्यामुळे शिर्डी ते नाशिक रस्त्याचे काम करण्यात यावे. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांना संपर्कामध्ये कुठलीही अडचण होऊ नये, म्हणून मोबाईल संपर्काची व्यवस्था भक्कम असावी. त्यासाठी आतापासूनच तयारी करण्यात यावी. द्वारका जंक्शन येथे वाहतूक सुरळीत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांमध्ये अंतर्गत रस्त्यांचा विचार करून परिसरातील रस्त्यांचा एकीकृत विकास करावा. नवीन घाटांच्या जागेकरिता शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा, यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करावा. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त व नाशिक येथील गोदावरी नदीतील पाणी कुंभमेळा दरम्यान शुद्ध राहण्यासाठी यंत्रणांनी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

नाशिक येथील काळाराम मंदिराचे काम करताना आजूबाजूच्या वाहतुकीला अडथळा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. राम काल पथाच्या कामाला गती देण्यात यावी. शहरातील ऑप्टिकल फायबर केबलचे काम वेगाने पूर्ण करावे. तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पातील नादुरुस्त सीसीटीव्ही बाबत पडताळणी करून नवीन सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घ्यावी. अमृत स्नानांच्या दरम्यान शहरातील भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महाविद्यालयांमधील जागा पार्किंग तसेच पोलिसांसाठी घेण्याबाबत संबंधित विभागाशी चर्चा करून निर्णय घ्यावा. निवृत्तीनाथ मंदिर ट्रस्टच्या कामांचा समावेश करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

# जालना समाजकार्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**जालना । प्रतिनिधी**



दि. ११ व १२ मार्च २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचालित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यात आले यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष उप प्राचार्य डॉ.मधु खोब्रागडे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासकीय अधिकारी रमेश गजर, सांस्कृतिक समन्वयक प्रा. डॉ. दिपक बुक्तरे, राजू वाघमारे हे उपस्थित होते यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के म्हणाले की वार्षिक स्नेहसंमेलनातुन विदयार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळतो व व्यक्तिमत्व विकासाची संधी प्राप्त होते तेव्हा विदयार्थ्यांनी अश्या प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होऊन आपला व्यक्तिमत्व विकास करून घ्यावा.

या वार्षिक स्नेहसंमेलनात विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले यात वक्तृत्व स्पर्धेत -भास्कर साळवे - प्रथम,नयना धांडगे- द्वितीय,योगेश खोसे - तृतीय, वादविवाद स्पर्धा - भास्कर साळवे, योगेश खोसे - प्रथम ,सागर लोखंडे,साक्षी रणशूर - द्वितीय,योगेश पवार,विकास राठोड - तृतीय,काव्य वाचन स्पर्धा - शुभांगी भुतेकर - प्रथम,भास्कर साळवे- द्वितीय,योगेश पवार तृतीय,निबंध स्पर्धा - नाटकर तुकाराम - प्रथम,ईश्वर चव्हाण - द्वितीय,योगेश पवार - तृतीय,पोस्टर्स स्पर्धा - नयना धांडगे - प्रथम योगेश पवार - द्वितीय, राठोड विकास - तृतीय,प्रश्नमंजुषा- साक्षी रणशूर,तुकाराम नाटकर - प्रथम,योगेश पवार, विकास राठोड- द्वितीय, पूजा प्रधान,योगेश खोसे - तृतीय, स्लोगन स्पर्धा - ईश्वर चव्हाण - प्रथम,योगेश पवार - द्वितीय,ज्ञानेश्वर इंदलकर - तृतीय,गीत गायन स्पर्धा - योगेश पवार - प्रथम, विकास राठोड - द्वितीय,श्रद्धा धुमाळ - तृतीय,अंताक्षरी स्पर्धा - शुभांगी राठोड, वष्णवी भुतेकर, नाटकर तुकाराम - प्रथम, योगेश पवार, साक्षी रणशूर, विकास राठोड - द्वितीय, सागर लोखंडे, श्रद्धा धुमाळ, पूजा प्रधान - तृतीय, रांगोळी स्पर्धा- निवेदिता बावस्कर -प्रथम, वैष्णवी भुतेकर - द्वितीय, शुभांगी भुतेकर- तृतीय, फॅन्सी ड्रेस स्पर्धा - शीतल मगर- प्रथम, साक्षी रणशूर - द्वितीय, वैभवी जगताप- तृतीय, संगीत खुर्ची - निवेदिता बावस्कर - प्रथम, योगेश पवार - द्वितीय, वैष्णवी भुतेकर- तृतीय क्रमांक पटकवला

या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समरोप कार्यक्रमात सर्व विजेत्यां स्पर्धे कांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सांस्कृतिक समन्व्यक प्रा.डॉ. दिपक बुक्तरे यांनी केले या कार्यक्रमात परीक्षक म्हणून प्रा. मधू खोब्रागडे,प्रा.डॉ. सुधीर गायकवाड,प्रा. बालाजी मुंडे, प्रा.डॉ.नरसिंग पवार, प्रा. प्रवीण कणकुटे, प्रा. डॉ. मीना बोर्डे, प्रा. डॉ. रेणुका बडवणे, यांनी काम पहिले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश दांडगे, शिवाजी भुतेकर, संजय गाडे यांच्यासह विदयार्थ्यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश खोसे यांनी केले तर प्रास्ताविक सांस्कृतिक समन्व्यक प्रा.डॉ. दिपक बुक्तरे यांनी केले तर योगेश पवार यांनी आभार प्रदर्शन केले.

# टीबी रुग्णालयातून सिलेंडर चोरी

**बुलढाणा । प्रतिनिधी**



देशभरात गॅस सिलेंडरच्या तुटवड्याने हाहाकार उडाला आहे. पहाटे पाच वाजेपासून नागरिक एका सिलेंडरसाठी एजन्सीबाहेर रांगेत उभे आहेत. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्याची नागरिकांची ओरड आहे. एका सिलेंडरसाठी इतकी कसरत सुरू असताना आता घरगुती गॅस सिलेंडर सुरक्षित नसल्याचे समोर आले आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापराच्या तक्रारी समोर येत आहे. अनेक ठिकाणी छापेमारीत गॅस टाक्या हस्तगत करण्यात येत आहे. या धामधुमीत एका चोरट्याने तर कहर केला आहे. त्याने बुलडाणा येथील रुग्णालयाच्या स्वयंपाकगृहातून गॅस सिलेंडर पळवला. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

बुलडाणा शहरातील क्षय आरोग्यधाम(टीबी रुग्णालय) येतील स्वयंपाकगृहातून भरलेला गॅस सिलेंडर चोरीला गेला आहे. सोबतच काही साहित्यही चोरीला गेल्याचे समोर आले आहे. चोरट्यांनी स्वयंपाकगृहाचा दरवाजा तोडून चोरी केली. या ठिकाणी १७ सिलेंडर होते. त्यातील एक सिलेंडर त्याने चोरला. त्याने इतर साहित्याचीही येथून चोरी केल्याचे समोर येत आहे. या चोरच्या घटनेची राज्यात चर्चा सुरू आहे. तर काही रुग्णालयांतील कँटिन मालक घटनेने अलर्ट झाले आहे. रात्रीच्यावेळी आता जागरण करावे काय असा सवालही विचारला जात आहे.

# विरारमध्ये अवैध शुक्राणू व्यापाराचा भांडाफोड

**मुंबई । प्रतिनिधी**



विरार येथे अवैधरित्या शुक्राणू साठवणूक करून त्याचा व्यापार करणाऱ्या एजन्सीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कोणतीही नोंदणीकृत वैद्यकीय शैक्षणिक पात्रता किंवा अधिकृत परवानगी नसतानाही दात्यांकडून मिळालेल्या शुक्राणूंची साठवणूक करून त्याची विक्री केली जात असल्याचे वसई-विरार महापालिकेच्याआरोग्य विभागाच्या पथकाच्या तपासणीत आढळून आले. या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाला विरार येथील पद्मीबाई टॉवरमध्ये असलेल्या जीवदानी सायंटिफिक कंपनीमध्ये अवैधरित्या शुक्राणू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी तपासणीसाठी वैद्यकीय पथकाची स्थापना करून संबंधित ठिकाणी कारवाईचे आदेश दिले.

यानुसार ९ मार्च रोजी आरोग्य विभागाच्या पथकाने पद्मीबाई टॉवरमधील जीवदानी सायंटिफिक कंपनी येथे अचानक भेट देत तपासणी केली. तपासणीदरम्यान ही कंपनी आणि संबंधित एजन्सी मयूर भागवत संखे आणि कमलेश शंकर खुत यांच्या मालकीची असल्याचे समोर आले. तपासात पुढे धक्कादायक बाब उघड झाली. संबंधित ठिकाण हे सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान अधिनियम २०२१ अंतर्गत एआरटी बँक म्हणून नोंदणीकृत नसल्याचे आढळून आले. तसेच कायद्याने आवश्यक असलेली वैद्यकीय शैक्षणिक पात्रता किंवा अधिकृत परवाना नसतानाही येथे दात्यांकडून मिळालेल्या शुक्राणूंची साठवणूक करून त्याचा अवैध व्यापार केला जात असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. या प्रकाराची गंभीर दखल घेत महापालिकेच्या आरोग्य विभागाने संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मटण खरेदीसाठी सक्ती, दरमहा खंडणीची मागणी; टिपू पठाण टोळीवर मोक्का

**मुंबई । प्रतिनिधी**



पुण्यातील गुन्हेगारी विश्वात दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध पुणे पोलिसांनी आपली 'धडाकेबाज' मोहीम सुरूच ठेवली आहे. काळेपडळ पोलिसांनी कुख्यात गुन्हेगार रिझवान ऊर्फ टिपू सत्तार पठाण आणि त्याच्या सात साथीदारांवर तिसऱ्यांदा मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.

या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी या टोळीतील एका फरारी साथीदारालाही बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टिपू पठाण आणि त्याची टोळी काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत हॉटेल चालक आणि मटण दुकानदारांना लक्ष्य करत होती. ही टोळी दुकानदारांकडे जाऊन मी सांगेन त्याच दुकानातून मटण खरेदी करायचे अशी सक्ती करत असे. तसेच, हॉटेल व्यवसाय सुरळीत चालू ठेवायचा असेल, तर दरमहा ५ हजार रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी दिली जात होती. पैसे न देणाऱ्यांना जीवे मारण्याची भीती दाखवून ही टोळी दहशत माजवत होती.

सय्यदनगरमधील ख्वॉजा मंजिल येथील आपल्या कार्यालयात एका हॉटेल मालकाला बोलावून, टिपू पठाणने त्याला स्वतःच्या भागीदारीतील मटण दुकानातून खरेदी करण्यासाठी दबाव टाकला आणि खंडणीची मागणी केली. या त्रासाला कंटाळून दुकानदारांनी काळेपडळ पोलिसांकडे धाव घेतली आणि तक्रार नोंदवली. या तक्रारीनंतर १६ फेब्रुवारी २०२६ रोजी टोळीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

टिपू पठाण आणि त्याच्या टोळीवर यापूर्वी दोन वेळा जागा बळकावून खंडणी उकळल्याप्रकरणी मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे (वेळेत दोषारोपपत्र दाखल न झाल्याने) त्यांना जामीन मिळाला होता. जामिनावर बाहेर येताच या टोळीने पुन्हा गुन्हेगारी कृत्य सुरू केले. याची गंभीर दखल घेत पुणे पोलीस आयुक्तांनी या टोळीवर तिसऱ्यांदा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लावला आहे.

या गुन्ह्यात गेल्या काही दिवसांपासून फरारी असलेला टिपूचा साथीदार फैजान ऊर्फ पच्चीस रमजान ऊर्फ कादर शेख (वय २१, रा. सय्यदनगर) याला काळेपडळ पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. टोळीतील इतर सदस्यांचा शोध सुरू असून, या कारवाईमुळे खंडणीखोर गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

# सायबर गुन्हेगाराचा संतापजनक प्रकार; शिक्षिकेचा डेटा चोरून ब्लॅकमेल

**बुलढाणा । प्रतिनिधी**




बुलढाणा जिल्ह्यातून सायबर गुन्हेगारी आणि महिलेला धमकावत विवस्त्र व्हिडीओ कॉल करायला लावणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका २७ वर्षीय शिक्षिकेचा मोबाईल हॅक करून, त्यातील खासगी डेटा चोरून त्यांना विवस्त्र होण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सोनाळा पोलिसांनी ऋषिकेश गिरी (वय २७) नावाच्या आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी ऋषिकेश गिरी याने पीडित शिक्षिकेचा मोबाईल बेकायदेशीरपणे हॅक केला होता. हॅकिंगच्या माध्यमातून त्याने शिक्षिकेचे व्हॉट्सप चॅट्स, ईमेल आणि गॅलरीमधील अत्यंत खासगी फोटो व व्हिडिओ स्वतःच्या ताब्यात घेतले.

यानंतर खरा छळ सुरू झाला. तुझे हे सर्व फोटो आणि व्हिडिओ मी तुझ्या पतीला व नातेवाईकांना पाठवून तुझी बदनामी करेन, अशी धमकी त्याने पीडितेला दिली

बदनामीच्या धाकाने पीडिता मानसिक तणावाखाली असताना, आरोपीने याचा गैरफायदा घेतला. त्याने शिक्षिकेला वारंवार व्हिडिओ कॉल करून विवस्त्र होण्यास भाग पाडले. नराधम ऋषिकेश एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने या व्हिडिओ कॉलचे स्क्रीन रेकॉर्डिंग करून ते पीडितेच्या बहिणीलाही पाठवले. जेव्हा पीडितेने विरोध केला, तेव्हा जर तू माझ्याशी शारीरिक संबंध ठेवले नाहीस, तर तुला आणि तुझ्या मुलाला ठार मारीन, अशी जीवघेणी धमकी त्याने दिली.

सततचा छळ आणि मुलाच्या जिवाला असलेला धोका लक्षात घेता, पीडित शिक्षिकेने अखेर सोनाळा पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली आहे. कलम ६७/२०२६ नुसार ७५(१),७५(२),७७,७८,३५२,३५१(२),३५१(३),३५६(२) इछड २०२३ सहकलम ६६(ए ), ६७,६७(-) माहिती तत्रज्ञान अधिनियम २००० नुसार तात्काळ गुन्हा दाखल केला आहे.

सध्या आरोपी ऋषिकेश गिरी फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. सायबर सुरक्षेबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# १५ हजारांचे अर्थसहायासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर ऑनलाइन अर्जांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**



दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ आणि दिव्यांग धोरण २०१८ मधील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी राज्य शासनाने पाऊल उचलले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी लागणारी साधनसामग्री (टूल किट) खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांपर्यंतचे वित्तीय सहाय्य देण्यात येणार आहे. तरी पात्र लाभार्थ्यांनी या योजनेसाठी दिव्यांग सहायक पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

सध्याच्या काळात नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. शासकीय किंवा शासनमान्य प्रशिक्षण संस्थांमधून, तसेच कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. आपल्या कौशल्यानुसार स्थानिक पातळीवर लघुउद्योग किंवा सेवा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारी उपकरणे खरेदी करण्यास यामुळे मदत होणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने केली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी दिव्यांग सहाय्यक या पोर्टलवर आपले अर्ज सादर करावेत. ऑफलाइन पद्धतीने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. प्राप्त अर्जांची छाननी जिल्हा कार्यालयामार्फत केली जाईल आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती पात्र लाभार्थ्यांची निवड करेल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पाणी मागितल्याचा गैरसमज; नागपुरात वृद्धेवर जमावाचा हल्ला

**नागपूर । प्रतिनिधी**



नागपूर शहरत मुलं चोरणारी टोळी सक्रिय असल्याच्या सोशल मीडियावरील खोट्या आणि तथ्यहीन अफवामुळे शहरात एका वृद्ध महिलेचा जीव जाताजाता थोडक्यात बचावला आहे. यात जमावाकडून होत असलेल्या बेदम मारहाणीतून पोलिसांनी कसंतरी या वृद्धेची सुखरूप सुटका केलीय. हिंगणा पोलीस स्टेशनचे हद्दीत इसासनी परिसरात राहणाऱ्या एक साठ वर्षीय महिलेसोबत हा प्रकार घडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साठ वर्षीय महिला या त्यांच्या नेहमीचं औषध घेण्यासाठी रुग्णालयात गेल्या होत्या. औषध घेऊन घरी परत येत असताना दुपारी थकवा आल्याने तसेच रोजची औषध घेण्याची वेळ झाल्यामुळे औषध खाण्यासाठी थांबल्या. त्यावेळी त्यांनी जवळील घरासमोर खेळणाऱ्या एका लहान मुलाकडे पिण्यासाठी पाणी मागितले. मात्र, मराठी आणि हिंदी भाषा नीट येत नसल्यामुळे भोजपुरी बोलणाऱ्या वृद्ध महिलेला आपली बाजू नीट मांडता आली नाही.

दरम्यान, त्याच ठिकाणी असलेल्या एका दुसऱ्या महिलेनं आरडाओरड करत साठ वर्षीय वृद्ध महिला तिच्या लहान मुलीला एका बॅगमध्ये टाकून अपहरण करण्याचा प्रयत्न करत होती, असा खोटा आरोप केला आणि जोरदार गोंधळ घातला. मराठी आणि हिंदी नीट बोलता येत नसल्यामुळे भोजपुरी भाषिक ती वृद्ध महिला आपला बचाव करू शकली नाही आणि आरोप करणाऱ्या महिलेने त्या वृद्ध महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण करणे सुरू केले. त्या ठिकाणी उपस्थित लोकांचाही गैरसमज झाला आणि वृद्ध महिला खरोखरच लहान मुलीचा अपहरण करण्याचा प्रयत्न करत होती, असे समजून गर्दीतील काही लोकांनीही तिला मारहाण करण्यास प्रोत्साहन दिले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत साठ वर्षीय वृद्ध महिलेची सुटका करत तिला सुरक्षित पोलीस स्टेशनमध्ये नेले. पोलीस स्टेशनमध्ये वृद्ध महिलेच्या मुलाला आणि सुनेला बोलावण्यात आले आणि सर्व प्रकार उघडकीस आला. दरम्यान नागपूरात गेले काही दिवस लहान मुलांना चोरणारी टोळी सक्रिय असल्याचे खोटे आणि तथ्यहीन अपप्रचार सोशल मीडियावर सुरू आहे आणि त्यामुळेच आज औषध खाण्यासाठी पाणी मागणाऱ्या एका वृद्ध महिलेला मुलं चोरणाऱ्या टोळीतील सदस्य समजून बेदम मारहाण करण्यात आली. त्यामध्ये त्या वृद्धेचा जीव जाता जाता वाचला.

२०१२ मध्ये अशाच पद्धतीने नागपूरच्या कळमना भागात नाथजोगी समाजातील तिघांना जमावाने मुलं चोरणाऱ्या टोळीचे सदस्य समजून बेदम मारहाण केली होती आणि त्यामध्ये तिघांचा जीव गेला होता.

# मुंबईच्या उद्योजिका प्रज्ञा पोंक्षे यांचे महिला सक्षमीकरणावर मंगळवारी विशेष व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी**



रोटरी आणि इनरव्हील फॅमिली ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १७ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता शहरातील रुक्मिणी गार्डन येथे महिला सक्षमीकरणावर मुंबई येथील 'त्रिमिती रचना' आणि 'हरहायनेस'च्या संस्थापक संचालिका व प्रसिद्ध उद्योजिका सौ. प्रज्ञा पोंक्षे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, त्या आर्थिक स्वावलंबन, स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न आणि स्मार्ट कमाई याबद्दल मोलाचे विचार मांडणार आहेत. याच कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ८ कर्तृत्ववान महिलांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

महिलांच्या प्रगतीला आणि विचारांना नवी दिशा देणाऱ्या या वैचारिक मेजवानीला जास्तीत जास्त नागरिकांनी, विशेषतः महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जालना, रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊन, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट तसेच इनरव्हील क्लब ऑफ जालना, इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्यावतीने करण्यात आले आहे.